पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून खालील दर्शविलेल्या दिनांकास प्रसिद्ध झालेली आहे.

बुधवार, जुलै २६, २०२३ / श्रावण ४, शके १९४५

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक २१ जुलै २०२३

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक टीपीएस-१६२१/२०२१/प्र.क्र.२३/२०२२/नवि-९.— ज्याअर्थी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (यापुढे "उक्त विमानतळ कंपनी" असे संबोधले आहे) ही कंपनी, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये संस्थापित झाली आहे व महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली कार्य करीत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विकास विभागाने शासन निर्णय क्रमांक एव्हीएन-१००८/प्र.क्र.५२०/०८/२८-अ, दिनांक २३ जुले २००८ अन्वये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित मार्फत विमानतळाच्या उभारणी / विकासासाठी मौजे काकडी, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर येथील अंदाजे ४०० हेक्टर खाजगी जमीन संपादित करण्यास, या जमीन संपादनासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांना विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) म्हणून घोषित करण्यास तसेच या संदर्भात अनुषंगिक बाबीस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१६०८/२६६२/प्र.क्र.१११/०९/नवि-९, दिनांक २८ मे २००९ व अधिसूचना क्रमांक टीपीएस-१६१७/३७६/प्र.क्र.२७७/२०१८/नवि-९, दिनांक २२ नोव्हेंबर २०१८ तसेच दिनांक २२ नोव्हेंबर २०१८ च्या अधिसूचनेस शुद्धीपत्र दिनांक ११ जानेवारी २०१९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र क्रमांक ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) याच्या कलम ४० च्या पोट-कलम १ (ब) अन्वये मौजे काकडी, तालुका कोपरगाव, मौजे वडझरी खुर्द, तालुका संगमनेर, मौजे केलवड खुर्द व बु., तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर येथील एकूण ३५०.८५ हेक्टर क्षेत्र "शिर्डी विमानतळ क्षेत्र" म्हणून "अधिसूचित क्षेत्र" जाहीर करून सदर क्षेत्राकरिता उक्त विमानतळ कंपनी यांची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे (यापुढे "उक्त प्राधिकरण" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने उक्त अधिसूचित क्षेत्राच्या सभोवताली क्षेत्राचे अनुषंगिक विकास होण्याच्या दृष्टीने सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील मौजे काकडी व मौजे मल्हारवाडी, संगमनेर तालुक्यातील मौजे वडझरी खुर्द व मौजे कासारे, राहाता तालुक्यातील मौजे केलवड, मौजे पिंपरी लोकाई व मौजे कोऱ्हाळे येथील एकूण १६२४.६८ हेक्टर आर क्षेत्र (यापुढे "उक्त क्षेत्र" असे संबोधले आहे) "Area Around Shirdi Hub Airport (AASHA)" म्हणून विकासासाठी निवड केली आहे (यापुढे "उक्त प्रयोजन" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट कलम १ (ब) अन्वये उक्त क्षेत्र उक्त प्रयोजनासाठी "अधिसूचीत क्षेत्र" म्हणून जाहीर करण्याची व उक्त क्षेत्रासाठी खत प्राधिकरणाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्याची विनंती दिनांक २९ नोव्हेंबर २०२१ रोजी रात्रीच्या पत्रान्वये शासनास केली आहे (यापुढे "उक्त प्रस्ताव" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने उक्त प्रयोजनासाठी सादर उक्त प्रस्तावास सुनियोजित विकासाच्या दृष्टीने मंजुरी प्रदान करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

आणि आता, त्याअर्थी, शासन उक्त अधिनियमाचे कलम ४० चे उप-कलम (१-ब), अन्वये व या अनुषंगाने प्राप्त इतर अधिकारांचा उपयोग करून-

(१) सोबतच्या उक्त परिशिष्ट "अ" मध्ये नमूद क्षेत्र उक्त प्रयोजनासाठी "अधिसूचित क्षेत्र" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(२) उक्त परिशिष्ट "अ" मधील अधिसूचित क्षेत्रासाठी उक्त विमानतळ कंपनी यांची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

(३) उक्त परिशिष्ट "अ" मधील अधिसूचित क्षेत्रासाठी सदर अधिसूचनेपूर्वी कार्यरत नियोजन प्राधिकरण, विशेष नियोजन प्राधिकरण, नवीन शहर विकास प्राधिकरण यांचे अधिकार संपुष्टात येत असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

प्रस्तुत अधिसूचना जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक महिन्यापर्यंत उपलब्ध राहील.

(१) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.

(२) जिल्हाधिकारी, अहमदनगर.

(३) विभागीय सहसंचालक नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.

(४) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई, ८ वा मजला वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.

परिशिष्ट - "अ"

अ. क्र.	जिल्हा	तालुका	गाव	क्षेत्र (हेक्टरमध्ये)
१	२	३	४	५
१	अहमदनगर	कोपरगाव	काकडी	६९९.२४
२	अहमदनगर	कोपरगाव	मल्हारवाडी	४६.०५
३	अहमदनगर	संगमनेर	वडझरी खुर्द	९५.८८
४	अहमदनगर	संगमनेर	कसारे	१८३.७५
५	अहमदनगर	राहाता	केलवड (खुर्द)	३१४.८
६	अहमदनगर	राहाता	केलवड (बु.)	
७	अहमदनगर	राहाता	पिंपरी लोकाई	७४.८४
८	अहमदनगर	राहाता	कोऱ्हाळे	२१०.१२
			एकूण अधिसूचित करावयाचे क्षेत्र ..	**१६२४.६८**

उपरोक्त अधिसूचित क्षेत्र व त्याच्या नकाशावर सीमा खालीलप्रमाणे आहेत.

उत्तरेस : वडझरी खुर्द गावामधील क्रमांक ८१, ८२ व ८४ आणि काकडी गावामधील सर्व्हे क्रमांक २२८, २२७, २२६, २९५, ३०२, ३१३, ३१८, ३१९, ३२०, ३३०, ३३४, १६६, ७९, ८४, ८५, ७२ (भाग), ८९ (भाग), ८७, ९२, ९४, ६९, ६८, ६७, ६६, ५६, ५५, ३६, ३७ व ३८ आणि कोऱ्हाळे गावामधील सर्व्हे क्रमांक ३७९, ३७८, ३८०, ३६६, ३५९, ३६०, ३६१ व ३४० आणि मल्हारवाडी गावामधील सर्व्हे क्रमांक ११८, १२१, १२२, १२३, १२४ व १११.

पूर्वेस : कोऱ्हाळे गावामधील सर्व्हे क्रमांक ३४०, ३२६, ३२७, ३२०, ३१८, ३१७, ३०६, ३०५ व २९७ आणि केलवड (बु.) गावामधील सर्व्हे क्रमांक १५१, १४८, १४७, ४३, ४२, ४० व ५२.

दक्षिणेस : कसारे गावामधील सर्व्हे क्रमांक १६७ (भाग), २१६, २१८, २२३, २२६, २२८ (भाग), २२९ (भाग), २३१, २३२, २३३, २३७, २३८, २३९, २४०, २४१, २४२, २४३, २४४ व २४५ पिंपरी लोकाई गावामधील सर्व्हे क्र. २१७, २१९, २२०, २२२ (भाग), २२३, २२६, २४८, २४९, २५०, २५३ व २५४ आणि केलवड (बु.) गावामधील सर्व्हे क्रमांक १०६, १०२, १०३, १२२, १२३, १२५, ४९, ५० व ५२.

पश्चिमेस : वडझरी खुर्द गावामधील सर्व्हे क्रमांक ८१, ८०, ९४, १०६, १०४, १४२, ११०, ११३, ११२, ११७, ११८, ११९ व १२० आणि कसारे गावामधील सर्व्हे क्रमांक १६६.

विद्यमान अधिसूचित क्षेत्र व प्रस्तावित अधिसूचित क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ - १९७५.५३ हे. आर

टिपा : १. क्षेत्र व सीमा उक्त क्षेत्राच्या संयुक्त मोजमाप आणि सीमांकनाच्या अधीन आहे.

२. वरील अधिसूचना सोबतच्या नकाशानुसार विचारात घ्यावी.

सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे **www.maharashtra.gov.in** (कायदे व नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध केलेली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

देवदत्त रहाणे,
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai - 400 032
dated, 21st July 2023

Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966

Notification

No.TPS-1621/2021/C.R.23/2022/UD-9.– Whereas, the Maharashtra Airport Development Company Limited (MADC) (hereinafter referred to as “the said Airport Company”) is a company incorporated under the Companies Act, 1956 and functions under the superintendence and control of the Government of Maharashtra ;

and whereas, Government of Maharashtra in General Administration Department *vide* Notification No. AVN.1008/C.R.520/08/28A, dated 23rd July 2008 has granted the administrative approval for acquisition of Private Land admeasuring 400 hectare for development / construction of airport and allied activities at village Kakadi, taluka Kopargaon, district Ahmednagar by Maharashtra Airport Development Company Limited (MADC) and to declare the said company as Special Planning Authority (SPA) ;

and whereas, Government of Maharashtra in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1608/2662/CR-111/09/UD-9, dated 28th May 2009 and *vide* Notification No. TPS-1617/376/C.R. 277/2018/UD-9, dated 22nd November 2018 and *vide* Corrigendum dated 11th January 2019 to Notification dated 22nd November 2018, notified an area admeasuring 350.85 Hectare of village Kakadi, taluka Kopargaon, village Wadzari Khurd, taluka Sangamner, village Kelwad (Kh+Bk.), taluka Rahata, district Ahmednagar as “the notified area”and appointed the said Airport Company as Special Planning Authority for the said area as per provisions of sub-section *(1-B)* of Section 40 of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Mah. Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as “the said Act”) ;

and whereas, the said Airport Company has identified the area as specified in the schedules appended hereto comprised within the Malharwadi village and Kakadi village of Kopargaon taluka, Wadzari Khurd village and Kasare village of Sangamner taluka, Pimpari Lokai village, Kelwad (Kh+Bk.) village and Korhale village of Rahata taluka detailed at in the Schedules appended admeasuring about 1624.68 Hectares (hereinafter referred to as “the said Area”), around the said notified area to be appropriate for the Development of Area around Shirdi Airport and described as “Area Around Shirdi Hub Airport (AASHA) (hereinafter referred to as “the said Purpose”) ;

and whereas, the said Airport Company *vide* it's letter dated 29th November 2021 has requested the Government of Maharashtra in Urban Development Department to notify the said Area for the said Purpose and appoint the said Airport Company as Special Planning Authority for the said Area as per provisions of sub-section *(1-B)* of Section 40 of the said Act (hereinafter referred to as "the said Proposal");

and whereas, it has been felt necessary to sanction the said Proposal submitted by the said Airport Company for the said Purpose for the planned development.

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section *(1-B)* of Section 40 of the said Act and of all the powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby–

(i) Notifies the area Specified in Schedule - "A"appended hereto as "the Notified Area" for the said Purpose.

(ii) Appoints the "said Airport Company"as the Special Planning Authority for the said Notified Area under Schedule - "A".

(iii) Declares that any Planning Authority, Special Planning Authority, New Town Development Authority functioning in the said Notified Area under Schedule- "A"prior to this notification shall cease to function in relation to the Notified Area from the date of this notification.

A copy of this Notification and plan showing the boundaries of the proposed notified area is kept open for inspection for the General Public during office hours on all working days at the following offices for a period of one month–

(1) The Divisional Commissioner, Nashik Division, Nashik.

(2) The Collector, Ahmednagar.

(3) The Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik.

(4) The Vice-Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd., 8th Floor, World Trade Centre, Cafe Parade, Mumbai - 5.

SCHEDULE - A

Sr. No.	District	Taluka	Village	Area in Hectare Comprised in the Village mentioned below
1	2	3	4	5
1	Ahmednagar	Kopargaon	Kakadi	699.24
2	Ahmednagar	Kopargaon	Malharwadi	46.05
3	Ahmednagar	Sangamner	Wadzari Khurd	95.88
4	Ahmednagar	Sangamner	Kasare	183.75
5	Ahmednagar	Rahata	Kelwad (Kh.)	314.8
6	Ahmednagar	Rahata	Kelwad (Bk.)	
7	Ahmednagar	Rahata	Pimpari Lokai	74.84
8	Ahmednagar	Rahata	Korhale	210.12
		Total Area to be notifies as SPA ..		**1624.68**

Boundaries of the aforesaid area as follows : -

To the North : Passing through the village Wadzari Khurd under Survey Nos. 81, 82 and 84 passing through the village Kakadi under Survey Nos. 228, 227, 226, 295, 302, 313, 318, 319, 320, 330, 334, 166, 79, 84, 85, 72 (Pt.), 89 (Pt.), 87, 92, 94, 69, 68, 67, 66, 56, 55, 36, 37 and 38 passing through the village Korhale under Survey Nos. 379, 378, 380, 366, 359, 360, 361 and 340 and passing through the village Malharwadi under Survey Nos. 118, 121, 122, 123, 124 and 111.

To the East : Passing through the village Khorhale under Survey Nos. 340, 326, 327, 320, 318, 317, 306, 305 and 297 and passing through the village Kelwad (Bk.) under Survey Nos.151, 148, 147, 43, 42, 40 and 52.

To the South : Passing through the village Kasare Under Survey Nos. 167 (Pt.), 216, 218, 223, 226, 228 (Pt.), 229 (Pt.), 231, 232, 233, 237, 238, 239, 240, 241, 242, 243, 244 and 245 passing through the village Pimpari Lokai under Survey Nos. 217, 219, 220, 222 (Pt.), 223, 226, 248, 249, 250, 253 and 254 and passing through the village Kelwad (Bk.) under Survey Nos. 106, 102, 103, 122, 123, 125, 49, 50 and 52.

To the West : Passing through the village Wadzari Khurd under Survey Nos. 81, 80, 94, 106, 104, 142, 110, 113, 112, 117, 118, 119 and 120 and passing through the village Kasare under Survey No.166.

Total area including the existing SPA Area and proposed SPA Area is 1975.53 Ha.

Note : 1. Area and Boundary is subject to joint measurement and demarcation on site.

2. This shall be read with the plan accompanying this notification.

This Notification shall be published on the Government's website **www.maharashtra.gov.in**

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

DEODATTA RAHANE,

Desk Officer to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.